# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.१/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ जानेवारी, २०२१

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका
कोविड-१९ संदर्भात प्रतिबंधात्मक क्षेत्रातील मतदारांबाबत..
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. १५/१२/२०२० चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याच्यादृष्टीने भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांच्या धर्तीवर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांमध्ये प्रतिबंधित क्षेत्र (कंटेन्मेन्ट झोन) म्हणून घोषित केलेल्या क्षेत्राबाबत स्वतंत्ररित्या सूचना देण्यात येतील असे मुद्दा क्र.९ (xxi) मध्ये नमूद करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन आता प्रतिबंधात्मक क्षेत्रातील मतदारांना मतदान करण्याकरिता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत :-

i) प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये वास्तव्यास असलेले मतदार जे कोविड-१९ बाधित नाहीत तसेच ज्यांच्या शरीराचे तापमान दोनदा तपासूनही विहित निकषांपेक्षा जास्त नसेल अशा मतदारांना सर्वसाधारण मतदारांप्रमाणे सकाळी ७.३० पासून मतदान करु द्यावे.

Scanned with CamScanner

ii) प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये वास्तव्यास असलेले मतदार जे कोविड-१९ बाधित आहेत अथवा ज्यांच्या शरीराचे तापमान दोनदा तपासूनही विहित निकषांपेक्षा जास्त असेल अशा मतदारांना मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र.९ (iv) व ९ (xx) नुसार तापमान जास्त असलेल्या अथवा विलगीकरण कक्षात ठेवलेल्या कोविड-१९ बाधित रुग्णांप्रमाणे मतदानाची वेळ संपण्याच्या अर्धा तास आधी प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोटरपणे पालन करुन मतदान करता येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत - आयुक्त, सर्व महानगरपालिका.

Scanned with CamScanner